# हॉटेल्समधून पैसे उकळणाऱ्या कॉपीराइट लायसन्स एजन्सींवर केलेल्या कारवाईबद्दल एफएचआरएआयकडून पुणे पोलिसांचे कौतुक

पुणे (प्रतिनिधी) : फोनोग्राफिक परफॉर्मन्स लिमिटेड (पीपीएल) च्या अधिकाऱ्यांना अटक केल्याबद्दल देशातील हॉटेल आणि रेस्टॉरंट्स इंडस्ट्रीची सर्वोच्च हॉस्पिटॅलिटी असोसिएशन फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाने (एफएचआरएआय) पुणे पोलिसांचे कौतुक केले आहे.

बंडगार्डन येथील एका हॉटेलमध्ये लग्न समारंभात संगीत कार्यक्रम आयोजित करण्यासाठी कॉपीराइट परवाना देण्याच्या बहाण्याने पीपीएल आणि नोव्हेक्स कम्युनिकेशन या दोन मुंबईतील खासगी कंपन्यांनी पुण्यातील व्यावसायिकांकडून १.३७ लाख रुपये उकळल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

पीपीएल आणि नोव्हेक्स कम्युनिकेशनच्या विरोधात कोरेगाव पोलिस ठाण्यात पुण्यातील संबंधित व्यावसायिकाने फिर्याद दिली होती. पीपीएल आणि नोव्हेक्सच्या पदाधिकाऱ्यांनी एकूण १ लाख ३७ हजार रुपये उकळले. तसेच एनओसी/परवान्यावर विवाह समारंभाचा उल्लेख न करता डीजे पार्टी आणि 'गेट टुगेदर पार्टी' अंतर्गत परवाना जारी केला, असे फिर्यादीत नमूद आहे. या गुन्ह्याप्रकरणी पीपीएलमधील आरोपी कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. तर नोव्हेक्स कम्युनिकेशनचे अधिकारी अद्याप फरार आहेत. एफएचआरएआयने पुणे पोलिस आयुक्तांना नोव्हेक्स कम्युनिकेशनवरही अशीच कारवाई करण्याची विनंती केली आहे. पुणे सत्र न्यायालयाने पीपीएलमधील आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

याबाबत एफएचआरएआयचे उपाध्यक्ष गुरबक्षीस सिंग यांनी सांगितले की, हॉटेल किंवा इतर ठिकाणी आयोजित विवाह कार्यक्रम आणि संबंधित सामाजिक कार्यक्रमांसाठी कोणतेही ध्वनी रेकॉर्डिंग वाजवण्याचा परवाना मिळविण्यास कायद्यात सूट आहे. २०१९ मध्ये सरकारकडून या संबंधीची एक सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे. तरीही, तथाकथित कॉपीराइट परवाना एजन्सी हॉटेल्स आणि त्यांच्या गेस्ट्सना धमकावत आहेत. त्यामुळे पीपीएलच्या अधिकाऱ्यांना अटक केल्याबद्दल आम्ही पुणे पोलिसांचे आभार मानतो. येथील सत्र न्यायालयाने पीपीएलमधील कर्मचाऱ्यांनी केलेला अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळला आहे. आम्ही पोलिस आयुक्तांना विनंती करतो की, नोव्हेक्स कम्युनिकेशनच्या अधिकाऱ्यांवर देखील पीपएल प्रमाणेच कारवाई करावी.

एफएचआरएआयचे सहसचिव प्रदीप शेट्टी यांनी याबाबत सांगितले की, विवाह कार्यक्रम आणि संबंधित सामाजिक कार्यक्रमांसाठी ध्वनी रेकॉर्डिंग वाजवण्याच्या परवान्यासाठी कायद्यातील सूटबद्दल सर्वांनाच माहिती नाही. त्यामुळे नोंदणी नसलेल्या कॉपीराइट एजन्सी हॉटेल्स तसेच गेस्ट्सकडून पैसे उकळीत आहेत. आमच्या सदस्यांकडून अशा अनेक तक्रारी आल्या आहेत. अशा घटना देशभरात वर्षानुवर्षे घडत आहेत आणि लग्नाच्या हंगामात अशा बेकायदेशीर प्रथेच्या घटना अधिकच सर्रास घडतात. आम्ही आमच्या सर्व सदस्यांना माहिती देण्याचा प्रयत्न करत आहोत आणि या एजन्सीच्या बेकायदेशीर कृतीबद्दल त्यांना जागरूक करण्यासाठी राज्यभरातील पोलिसांसह कायदा अंमलबजावणी संस्थांपर्यंत पोहोचत आहोत.

आम्ही देशभरातील पोलिसांना विनंती करतो की, त्यांनी संबंधित प्रदेशातील अशा सर्व तक्रारींची दखल घ्यावी वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने २७ ऑगस्ट २०१९ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, सर्व धार्मिक आणि विवाह संबंधित कार्यांना कॉपीराइट शुल्क भरण्यापासून सूट दिली जाईल. अशा कार्यक्रमांमध्ये सर्व धार्मिक कार्ये, विवाह कार्ये, प्रतिबद्धता (शपसरसशाशपी) आणि रिसेप्शन यांचा समावेश असेल. त्यामुळे एफएचआरएआयने असेही नमूद केले आहे की, कॉपीराइट कायदा १९५७ चे कलम ५२ विवाह मिरवणूक आणि विवाहाशी संबंधित इतर सामाजिक उत्सवांसह सर्व धार्मिक कार्यांसाठी रॉयल्टी किंवा परवाना शुल्क भरण्यावर सूट प्रदान करते.